# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


---

# वार्तापत्र

दिनांक २३/०८/२०१९

## गडचिरोली पोलीस दलाच्या ‘प्रयास’ उपक्रमास विदयार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद

- **गडचिरोली पोलीस दलाच्या नाविण्यपुर्ण उपक्रमात दुर्गम व अति दुर्गम भागातील २१,५४७ विदयार्थ्यांचा सहभाग**

मा.पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सा.यांच्या संकल्पनेतुन मा. अपर पोलीस अधीक्षक, गडचिरोली डॉ. मोहित कुमार गर्ग यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक २३/०८/२०१९ रोजी प्रयास (POLICE REACHING OUT TO YOUTH & STUDENTS ) उपक्रमा अंतर्गत गडचिरोली जिल्हयातील सर्व आश्रमशाळांमध्ये विर बाबुराव सेडमाके सामान्य ज्ञान तिमाही स्पर्धा - २०१९ घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्हयातील दुर्गम व अति दुर्गम भागातील १०२ आश्रमशाळांतील २१,५४७ विदयार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेला संपुर्ण गडचिरोली जिल्हयातील आश्रमशाळेतील विदयार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद दिलेला असुन सदर स्पर्धा परीक्षेदरम्यान विदयार्थ्यांमध्ये मोठया प्रमाणावर उत्साह दिसुन आला.

गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे संविधान दिनाचे औचित्य साधुन २६ नोव्हेंबर २०१८ पासुन दररोज जिल्हयातील प्रत्येक आश्रमशाळेत १० सामान्य ज्ञानाचे प्रश्न व्हाट्सॲप द्वारे संबंधीत आश्रमशाळेतील समन्वयक म्हणुन नियुक्त केलेल्या शिक्षकांना पाठविले जात होते. सदर शिक्षकामार्फत सदरचे प्रश्न दैनंदिन परिपाठाच्या माध्यमातुन त्यांचे आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना माहिती करुन देण्यात येत होते. या सर्व प्रश्नांतुन ५० प्रश्नांची प्रश्न पत्रिका सामान्य ज्ञान तिमाही स्पर्धा परिक्षेत देण्यात आली होती.

या तिमाही परिक्षेत जिल्हयातुन प्रथम क्रमांकाने उतीर्ण होणाऱ्या विदयार्थ्यास ३,१००/- रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकाने उतीर्ण होणाऱ्या विदयार्थ्यास २,१००/- रुपये व प्रमाणपत्र आणि तृतीय क्रमांकाने उतीर्ण होणाऱ्या विदयार्थ्यास १,५००/- रुपये व प्रमाणपत्र तसेच त्यानंतर क्रमांक ४ पासुन पुढील २२ विदयार्थ्यांना प्रत्येकी ५००/- रुपये व प्रमाणपत्र आणि प्रत्येक आश्रमशाळेतुन प्रथम येणाऱ्या विदयार्थ्यास प्रोत्साहनपर म्हणुन २००/- रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

नक्षल प्रभावित अतिसंवेदनशिल गडचिरोली जिल्हयाचा लोकशाही व शांततेच्या मार्गाने विकास कसा साधला जाईल, या करीता गडचिरोली पोलीस दलातर्फे विविध नाविन्यपुर्ण उपक्रम व योजना राबविण्यात येत आहेत. गडचिरोली जिल्हयातील अति दुर्गम व दुर्गम भागातील आश्रमशाळेतील विदयार्थ्यांचा सर्वागीण विकास होण्याच्या दृष्टीने तसेच त्यांचे बौध्दीक कला-गुणांना वाव मिळुन त्यांना स्पर्धा परिक्षेची माहिती व्हावी आणि त्यांच्या ज्ञानात भर पडावी व भविष्यातील प्रशासकिय अधिकारी घडविण्यासाठी सदर उपक्रमाची सुरवात गडचिरोली पोलीस दलाने केली आहे.

मा.पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सा. यांनी सदर स्पर्धा परिक्षेत सहभागी झालेल्या विदयार्थ्यांचे तसेच सदर स्पर्धा परिक्षा यशस्वी करण्यासाठी झटणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

